(२६) ③

व्यवस्थापन परिषदेची दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| १. | **दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**<br><br>**असा ठराव करण्यात आला की, दि. १० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मान्य करण्यात आले :-** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | १)पान क्र. ६ बाब क्र. १ मधील मुद्दा क्र तीन मधील दुसऱ्या ओळीमध्ये "Gorge" च्या ऐवजी "George" असे वाचावे. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग |
| ठराव | २)पान क्र. ६ इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने पारित झालेल्या ठरावावरील मुद्दा क्र. १ "बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदला संदर्भात No Dues Certificate २०११ पासून दिलेले आहे; तेव्हा बिर्ला महाविद्यालयाबाबत No Dues Certificate हे संलग्नता विभागाने महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून देण्यात यावे."<br>च्या ऐवजी<br>**"संलग्नता/वित्त व लेखा विभागाने बिर्ला महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून आजपर्यंत किती येणे (DUES) बाकी आहेत याची तसेच संलग्नता विभागाने महाविद्यालयाचे नाव बदल केले असल्यास त्याची माहिती पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत देण्यात यावी."** | संलग्नता व मान्यता विभाग,<br><br>वित्त व लेखा विभाग |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | १.संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी /१८-१९/२१८६ दि. २८ जानेवारी, २०१९ नुसार मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांना संलग्नित शुल्काची मुळ रक्कम व दंडाची वसुली करण्याकरिता पत्र पाठविण्यात आलेले आहेत. | संलग्नता व मान्यता विभाग |
| | २.संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी /१८-१९/२०८४ दि. ५ जानेवारी, २०१९ नूसार मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार संलग्नता शुल्काबाबत महाविद्यालयांना पत्र पाठविले आहे. | संलग्नता व मान्यता विभाग |
| | ३.संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता /आयसीडी/१८-१९/२०७० दि. ३ जानेवारी, २०१९ रोजी बिर्ला महाविद्यालयास वार्षिक शुल्काच्या पावत्या सादर करण्याबाबत पत्र पाठविले आहे. | संलग्नता व मान्यता विभाग |
| | ४.संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/१७-१८/२०९१ दि. १५ फेब्रुवारी, २०१८ नुसार बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स यांना नावात बदल करण्याबाबतचे पत्र पाठविण्यात आल्याचे कळविले आहे. (पत्र संलग्न) | संलग्नता व मान्यता विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | ३) पान क्र. ९, बाब क्र. ४ मधील खालील प्रथम परिच्छेद वगळण्यात यावा :-<br>"तसेच असाही ठराव करण्यात आला की, प्रशासकीय स्तरावर व्याख्यान कक्ष देण्याबाबत व्यावसायिक दराने भाडे निश्चित करण्यात यावे व त्यानुसार भाडे करार बनविण्यात यावा." | — |
| | ४) पान क्र.९ वरील बाब क्र. ६ मधील मुद्दा क्र. ४ मध्ये खालील वाक्याचा समावेश करण्यात यावा :-<br>**"नियुक्ती करताना प्रक्रिया राबविण्यात आली का?"** | |
| | ५)पान क्र. १० बाब क्र. ७ च्या ठरावातील परिच्छेद क्र.२ "असाही ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/ संस्थांमधून क्रिडा निधी जमा झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय माहिती सादर करण्यात यावी."<br>च्या ऐवजी दुरूस्तीसह खालील ठराव करण्यात आला.<br>**असा ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/संस्थांच्या नावासह क्रिडा निधी जमा झाल्याची व ज्या महाविद्यालये/ संस्थांकडून क्रिडा निधी जमा न झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय रक्कमेची माहिती वित्त व लेखा विभागाकडून सादर करण्यात यावी.** | क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग<br>—<br>वित्त व लेखा विभाग |
| क्रिडा व शारिरीक शिक्षण विभागाने केलेली कार्यवाही | क्रिडा व शारिरीक शिक्षण विभागाने पत्र क्र.क्रिडा १७५५/२०१८ दि. २४ डिसेंबर, २०१८ नुसार वरिल बाबत वित्त व लेखा विभागास कळविले आहे. (पत्र संलग्न)<br>तसेच क्रिडा व शारिरीक शिक्षण विभागाने पत्र क्र.क्रिडा २०६५/२०१९ दि. २८ जानेवारी, २०१९ नुसार विविध महाविद्यालयांकडून धनादेश/धनाकर्ष द्वारे जमा झालेल्या वार्षिक क्रीडा अंशदानाची यादी सोबत जोडली आहे.<br>तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून क्रीडा अंशदान (Annual Sports Contribution) तसेच विद्यापीठातील इतर सर्व शुल्क ऑनलाईन (Online) स्विकारण्यात येत आहे. हया संदर्भातील सविस्तर माहितीसाठी वित्त व लेखा विभाग तसेच एम.के.सी.एल. यांच्याशी पत्र व्यवहार केलेला आहे. | — |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | वित्त व लेखा विभागाने पत्र क्र. वि. व ले/ग्रुप ६/संकीर्ण/४९८/२०१९ दिनांक २५/३/२०१९ रोजी नुसार एकूण महाविद्यालये ८१३ जमा झालेला क्रिडा निधी एकूण रु.३,५१,७३,३००/- (३५१.७३ लक्ष) विद्यार्थी संख्या ६,०४,२५८ असे कळविले आहे. | |
| | ६) पान क्र. ११ बाब क्र. १० परिच्छेद क्र. २ :- "चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीबाबत नविन कायद्यानुसार निवडणुक नोंदणी शुल्काची आकारणी केली नाही त्यामुळे विद्यापीठाचे झालेले आर्थिक नुकसान तसेच विविध अभ्यास मंडळाच्या निवडणुका घेण्यात आलेल्या अडचणी व या अनुषंगाने प्राप्त झालेली निवेदने याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ | निवडणूक विभाग<br>— |

| | | |
|---|---|---|
| | अधिनियम, २०१६ मधील तरतुदी व परिनियमाच्या अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतची डॉ. नरवडे यांनी केलेल्या मागणीची नोंद घेण्यात आली.”<br>**<u>च्या ऐवजी दुरूस्तीसह ठराव करण्यात आला.</u>**<br><br>“चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार पदवीधर नोंदणीसाठी नोंदणीशुल्क रूपये ४०/- न आकारल्यामुळे विद्यापीठाचे झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण आहेत ते तपासावे तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत प्रा. वैभव नरवडे यांचे निवेदन विविध संघटनांनी केलेली निवेदने/तक्रारींबाबत निवडणूक प्रक्रियेत कायद्याचे व परिनियमांचे नेमके कोठे उल्लंघन झाले आहे हे तपासण्यासाठी समिती गठित करण्यात यावी. समिती स्थापन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.” | |
| **<u>निवडणूक विभागाने केलेली कार्यवाही</u>** | निवडणूक विभागाने पत्र क्र.नि.वि./आयसीडी/२०१८-१९/६४९ /२०१९ दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी श्री सुभाष कृष्णा वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असे कळविले. | |
| | ७)पान क्र. १३ बाब क्र. १४ मधील ठरावावरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये “श्री. प्रदीप सावंत यांनी डॉ. तुषार देसाई, रूपारेल महाविद्यालय यांचे नाव सुचविले” या वाक्याचा समावेश करण्यात यावा. | |
| | ८)पान क्र. १४ बाब क्र. १८ मधील, चौथ्या ओळीतील “सर्व प्रलंबित व” हे शब्द वगळण्यात यावे, तसेच ठरावामध्ये खालील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.<br>“असाही ठराव करण्यात आला की, यू.जी.सी.चे नोटीफिकेशन लागू होण्याअगोदर विद्यापीठाकडे उपरोक्त विषयांवर ज्या प्रकरणांवर कार्यवाही सुरू झाली आहे; त्या प्रकरणांवर विद्यापीठ स्तरावर उचित कार्यवाही करण्यात यावी तसेच ज्या प्रकरणांवर कार्यवाही सुरू झालेली नाही त्या प्रकरणांवर यू.जी.सी. नोटिफिकेशन प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.<br>चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, प्लॅगरिझमच्या किती केसेस विद्यापीठाकडे दाखल झाल्या आहेत याची माहिती देण्यात यावी.” | **<u>प्रबंध विभाग</u>** |
| | ९)पान क्र. १७ बाब क्र.२४, ठरावामधील ओळ क्र. ६ मध्ये Planningच्या ऐवजी “Planning/Geography” असे वाचावे. | |
| | १०)पान क्र. २० चर्चेच्या अनुषंगाने पारित झालेल्या मुद्दा क्र. २) मधील ओळ क्रमांक २ मध्ये “विषयानुसार सामाईक सेवा ज्येष्ठता” च्या ऐवजी “विषयाबाबत शिकविण्याच्या अनुभवानुसार” असे वाचावे. | **<u>शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.)</u>** |

| | | |
|---|---|---|
| | **इतिवृत्तावरील विविध विषयांवरील चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित झाले :-** | |
| **ठराव** | १)कुलसचिव, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी ही विद्यापीठ प्रशासनातील अत्यंत महत्वाची पदे असल्याने सदर पदांची जाहिरात त्वरीत देण्यात यावी. त्याचप्रमाणे संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संचालक, नवोपक्रम, नवोसंशोधन व सहाचार्य मंडळ, संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक क्रिडा व शारिरीक शिक्षण व विद्यापीठाच्या विनाअनुदानीत विभागांचे संचालक जसे की, आयडॉल, अल्केश दिनेश मोदी संस्था, गरवारे संस्था, थिएटर आर्टस् व अन्य संचालक पदांची जाहिरात देण्यात यावी. | **आस्थापना विभाग १/३**<br><br>**शिक्षक नियुक्ती व मान्यता (वि.शि.)** |
| **शिक्षक नियुक्ती व मान्यता (वि.शि.) विभागाने केलेली कार्यवाही** | जाहिरात क.३/२०१८-१९ अन्वये दि. ५ डिसेंबर, २०१८ रोजी जाहिरात देण्यात आली असून सदर जाहिराती द्वारे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी पूर्ण करण्यात आली आहे. | |
| **आस्थापना विभाग १/३ यांनी केलेली कार्यवाही** | आस्थापना विभागाने पत्र क.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/२८५१ दिनांक २३ जानेवारी, २०१९ नुसार कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ हे दोन्ही पदे जाहिरात देऊन व मुलाखती होऊन भरती प्रक्रिये द्वारे पार पडून रूजू झालेली आहेत.<br><br>तसेच संचालक, नवोपक्रम, नवोसंशोधन व सहाचार्य मंडळ, संचालक, क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग या पदाची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येउन सदर अर्जाची छाननी समिती तर्फे छाननी झाली आहे व निवड समिती करीता नावे मिळण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.<br><br>संचालक, विद्यार्थी विकास विभाग व संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदासाठी परिपत्रक काढुन तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्दी पत्रक देउन अर्ज मागविण्यात आलेले आहेत व अर्जाची छाननी समितीची सभा लवकरच आयोजित करण्यात येईल.<br><br>आस्थापना विभागाने पत्र क.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/३०६० दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ नुसार कार्यवाही सुरू असल्याचे कळविले आहे. | |
| **ठराव** | २)मेसर्स जाधव ॲण्ड कंपनीच्या अहवालानुसार त्वरीत सर्व संबंधित महाविद्यालयांना संलग्नता शुल्काची मुळ रक्कम व दंडाची वसुली करण्याकरिता पत्र पाठविण्यात यावीत. महाविद्यालयाकडून मिळत असलेली रक्कम सर्व हक्क अबाधित ठेवून जमा करून घ्यावी. मेसर्स जाधव ॲण्ड कंपनीच्या अहवालानुसार महाविद्यालयांकडून थकबाकी रकमेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अशा तक्रारींचे | वित्त व लेखा विभाग<br><br>संलग्नता व मान्यता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | निवारण करण्यासाठी समिती गठित करण्यात यावी.<br><br>समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत महाविद्यालयांकडून याबाबत किती रक्कम जमा झाली याची माहिती देण्यात यावी. | - |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१८-१९/१७०२ दि. २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी नुसार संबंधित महाविद्यालयांना संलग्नता शुल्काची मुळ रक्कम आणि दंडाची वसुली करण्यातकरिता पत्र पाठविण्यात आल्याचे कळविले आहे. | |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | वित्त व लेखा विभागाने परिपत्रक क्र. एफएओ/आयसीडी/२०१८-१९/१ दि. २४ डिसेंबर, २०१८ नुसार सर्व महाविद्यालयांना संलग्नता शुल्क व दंडाच्या वसुली बाबत कळविले आहे. | - |
| ठराव | ३)व्यवस्थापन परिषदेत विविध बाबींवर गठित झालेल्या समितीचे ठराव त्याच बैठकीत मंजूर करण्यात यावेत. | |
| ठराव | ४)प्रदीप सावंत यांनी सांगितले की, विद्यापीठाने रत्नागिरीत सब सेंटर करिता नऊ लाखाला जागा घेतली होती. तसेच रत्नागिरी सब-सेंटरचा काही भाग आपण कोस्टगार्डला देणार आहोत की दिला आहे; ती जागा कोस्टगार्डला दिली त्या बदल्यात अधिकचा एफ.एस.आय. मिळणार आहे काय याबाबत माहिती घेऊन व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावी. | रत्नागिरी सब सेंटर |
| रत्नागिरीत सब सेंटर यांनी केलेली कार्यवाही | रत्नागिरी उपकेंद्राने पत्र क्र. मुंविककेंकार/व्यवस्थापन परिषद ठराव/कोस्ट गार्ड/भुसंपादन/७९८०/२०१८ दि. २७ डिसेंबर, २०१८ नुसार माहिती दिली आहे. | - |
| | ५)विद्यापीठातील तीन कर्मचारी डेंग्यूमुळे दगावल्याने त्यांच्या पाल्यांनी उपचारावर झालेला खर्च अदा करण्याच्या विनंतीबाबत, तसेच चर्चेच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या १० सप्टेंबर, २०१८, बाब क्र. २७ विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबत व गटविमायोजनेचे नुतनीकरण करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर असा ठराव करण्यात आला की, गटविमा योजना नुतनीकरण करतांना कुटुंबाच्या व्याख्येमध्ये "आई-वडीलांचा देखील समावेश करण्यात यावा" मागील वर्षी विद्यापीठाने जेवढी रक्कम दिली होती त्या रक्कमे वरील रक्कम सर्व कर्मचा-यांच्या पगारातून कपात करण्यात यावी. खाजगी कंपनीकडून देखील निविदा मागविण्यात याव्यात. | आस्थापना विभाग २/४ |

| | | |
|---|---|---|
| **आस्थापना विभाग २/४ यांनी केलेली कार्यवाही** | आस्थापना २/४ विभागाने पत्र क्र.इएसटी/आयसीडी/१८-१९/२८६१ दि. २८ जानेवारी, २०१९ नुसार गट विमा योजनेबाबत कुलसचिवांच्या स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले त्या नूसार सदर प्रकरणी कार्यवाही होईल असे कुलसचिवांनी सुचविले. सदर बाबत व्यवस्थापन परिषद दिनांक २९ जानेवारी, २०१९ च्या बैठकीत बाब ठेवली व ठराव संबंधित विभागाना कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला. | - |
| | ६)बाब क्र. ४ "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांनी विद्यापीठ फोर्ट विभागामध्ये सायंकाळी व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष (Lecture Rooms) उपलब्ध करून देण्याबाबत गठित करण्यात आलेल्या समितीचा अहवाल" वरील चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, सदर जागेवर व्यावसायिक स्तरावर भाडे ठरविण्यासाठी स्वतंत्र बाब ठेवण्यात यावी. | **सामान्य प्रशासन विभाग फोर्ट** |
| **सामान्य प्रशासन फोर्ट यांनी केलेली कार्यवाही** | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र. GAD/ICM/2018-19 दिनांक डिसेंबर, २०१८ नुसार विद्यापीठ अभियंता यांना पुढील कार्यवाही बाबत पत्र पाठविले आहे. | - |
| | ७)बाब क्र. १० "विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत." वरील ठरावावरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीच्या कामानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानधन देण्याची बाब पुनश्च: सादर करण्यात यावी. | |
| **निवडणूक विभागाने केलेली कार्यवाही** | निवडणूक विभागाने सदर बाब दि. २९ जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत ठेवली आहे. | |
| | ८)बाब क्र. २८ "विद्वत परिषदेच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर." वरील ठरावावरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ च्या बैठकीतील बाब क्र. ७.२ मध्ये सहायक प्राध्यापक (सायकोलॉजी) च्या पदाची सातत्यता ठेवण्यात येईल. | **विद्याविषयक प्राधिकरणे विभाग**<br><br>**दूर व मुक्त अध्ययन संस्था** |
| **विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही** | विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने पत्र क्र.AA/ICD/2018-19/765 दि. ४ डिसेंबर, २०१८ नुसार दुर व मुक्त अध्ययन संस्थेस वरिल बाबतीत कार्यवाही करण्याबाबत पत्र पाठविले आहे. | - |

| | | |
|---|---|---|
| | ९)विद्यापीठाने महाविद्यालय/संस्थाना कोणतेही परवानगी पत्र देताना विद्यापीठाच्या सर्व संबधित विभागाकडून नो डयूज सर्टिफिकेटची तपासणी करूनच द्यावे. | संलग्नता व मान्यता विभाग<br>प्रबंध विभाग |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/ १८-१९ / २५४१ दिनांक २६ मार्च २०१९ नुसार महाविद्यालय/संस्थाना कोणतेही परवानगी पत्र देताना नो डयूज सर्टिफिकेट बघूनच पत्र देण्यात यईल असे कळविले आहे. | — |
| प्रबंध विभागाने केलेली कार्यवाही | प्रबंध विभागाने पत्र क्र.प्र.वि./आयसीडी/२०१८-१९/५५३५ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्रानुसार ठरावाचे काटेकोरपणे पालन करण्यात येत असून पी.एच.डी. अभ्यासक्रमाचे पूर्ण शुल्क भरणा केल्यानंतरच केंद्राना परवानगी पत्र देण्यात येते असे कळविले आहे. | |
| | १०)बाब क्र. ३० "विद्यापीठास प्राप्त झालेल्या अनेक तक्रारीनुसार डॉ. बी.एल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दिलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्याबाबत." या बाबी वरील ठरावावरील माहिती देताना कुलसचिवांनी सांगितले की सदर महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस देऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.)<br>विशेष कक्ष |
| विशेष कक्षाने केलेली कार्यवाही | डॉ. बी.एल. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दिलेल्या अहवालानुसार सदर महाविद्यालयास पत्र क्र. वि.क./आयसीडी/२०१८-१९/४४५ दि. २३ जानेवारी, २०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस पाठविली. | — |
| | ११)विद्यापीठातील/संलग्न महाविद्यालयातील उपलब्ध असलेल्या आर्थिक/मनुष्यबळाचा वापर कामकाजामध्ये गती आणण्याकरिता तसेच शिक्षक पदांच्या मान्यते संदर्भात शिक्षकांच्या "One Time Approval" बाबत केलेली सूचना तत्वत: मान्य करण्यात आली व सदर बाबीकरिता प्रभारी कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. कुऱ्हाडे, डॉ. भामरे आणि प्रा. नरवडे यांची समिती नेमण्यात यावी. | शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र. टीएएएस(सीटी)/आयसीडी/१८-१९/८६१ दि. २ जानेवारी, २०१९ नूसार सदर समितीची बैठक आयोजित करण्यात आली असून समितीचा अहवाल अधिष्ठाता मंडळाच्या दि. २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेच्या दि. ७ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. कार्यवाही सुरू आहे. | — |
| | १२)दि. २५ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेत, बाब क्र ९ अन्वये झालेल्या ठरावानुसार तात्पुरत्या सुरक्षा रक्षकांना अद्याप गणवेश देण्यात आलेला नाही, तसेच त्यांना अतिरिक्त भत्ता अजूनही वाढीव दराने देण्यात येत नाही, याबाबत डॉ. वैभव | सामान्य प्रशासन फोर्ट |

| | | |
|---|---|---|
| | नरवडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.<br>त्या अनुषंगाने कुलगुरूंनी सभागृहास आश्वासित केले की, ठरावानुसार गणवेश देण्यात येईल आणि अतिरिक्त भत्ता देणेबाबत त्वरित योग्य तो निर्णय घेण्यात येईल. | सुरक्षा विभाग फोर्ट |
| सामान्य प्रशासन फोर्ट यांनी केलेली कार्यवाही | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र. GAD/ICM/2018-19/981 दि. २७ नोव्हेंबर, २०१८ आणि २५ जानेवारी, २०१९ नुसार वरील बाबत कार्यवाही झाल्या बाबतचे कागदपत्र सोबत जोडले आहे. | |
| सुरक्षा विभाग फोर्ट यांनी केलेली कार्यवाही | सुरक्षा विभागाने पत्र क्र.SO/01/2018 दि. ६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार हंगामी सुरक्षा रक्षकांना गणवेश देण्यात आला आहे. तसेच अतिरिक्त कामाचा भत्ता वाढीव दराने देण्याची प्रक्रिया अंतिम टप्पात आहे. असे कळविले आहे. | — |
| | १३)आयडॉलमध्ये मार्क वाढविण्याच्या प्रकरणात पोलीस स्टेशनला तक्रार केली असता काय झाले? तसेच कर्मचाऱ्याबाबत व इतरही सविस्तर माहिती देण्यात यावी. चौकशी समिती वगैरे नेमली आहे का? याबाबतची सविस्तर माहिती पुढील व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी. | दूर व मुक्त अध्ययन संस्था |
| दूर व मुक्त अध्ययन संस्था यांनी केलेली कार्यवाही | दूर व मुक्त अध्ययन संस्थेने दि. ६ डिसेंबर, २०१८ रोजी केलेल्या ई-मेल द्वारे संबंधित बाबतीत दोषी असलेल्या कर्मचा-या विरोधात पोलिसात प्राथमिक तक्रार नोंदविली गेली. त्या कर्मचा-याने आपला गुन्हा कबुल केला व दुर व मुक्त संस्थेने त्याला नोकरीवरून काढून टाकले असे कळविले आहे. | — |
| | १४) कलिना परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना व त्यांच्या अमंलबजावणीबाबत व्यवस्थापन परिषदेत सविस्तर माहिती देण्यात यावी. | |
| सुरक्षा विभाग फोर्ट यांनी केलेली कार्यवाही | सुरक्षा विभागाने पत्र क्र.SO/01/2018 दि. ६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार कलिना परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना व त्यांच्या अमंलबजावणीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. (पत्र संलग्न) | |
| बाबः २ | **दिनांक ९ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावारील कार्यवाही अहवाल सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावी. | — |
| बाबः ३ | **दिनांक १४ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावारील कार्यवाही अहवाल सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| | कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील ठराव पारीत झाले. | |
| **बाब: ४** | **प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणे पूर्ण करण्याकरता शासन पत्र संकिर्ण १६१९/प्र.क्र. ५३/११अ दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१०१४/प्र.क्र. ५५/११-अ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकारी यांचा मानधन निश्चित करण्याबाबत शासननिर्णय व्यवस्थापन परिषदेपुढे स्विकृतीबाबत प्रस्ताव.** | आस्थापना विभाग २/४ |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणाची वर्षनिहाय कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी सादर करण्यात यावी व सविस्तर प्रस्ताव पुनश्च: व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावा. | |
| **आस्थापना विभाग २/४ यांनी केलेली कार्यवाही** | आस्थापना विभागाने सदर बाबत व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यासाठी पाठविली असून सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि. २९ जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आली आहे. | — |
| **बाब: ५** | **माळी कर्मचा-यांना दर तीन वर्षाऐवजी दर दोन वर्षांनी रेनकोट पुरविण्याबाबत.** | सामान्य प्रशासन विभाग फोर्ट |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, माळी कर्मचा-यांना दर तीन वर्षाऐवजी दर दोन वर्षांनी रेनकोट पुरविण्याबाबतची बाब वित्त व लेखा समिती समोर ठेवण्यात यावी. | |
| **सामान्य ०१प्रशासन विभाग फोर्ट यांनी केलेली कार्यवाही** | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र.GAD/ICM/2018-19/1050 दि. ७ डिसेंबर, २०१८ रोजी रेनकोट पुरविण्या बाबतची बाब वित्त व लेखा समिती समोर ठेवण्यासाठी वित्त व लेखा विभागास पाठविली आहे. कार्यवाही सुरू आहे. | — |
| **बाब: ६** | **के.सी. विधी महाविद्यालयातील श्री. शाह नितेश राजेंद्र (आसन क्रमांक ८३३३९) या विद्यार्थ्याचे विधी शाखेच्या द्वितीय वर्ष (सत्र-४) एप्रिल, २०१५ या परीक्षेचे गुण निकाल जाहिर झाल्यानंतर पाठविल्यामुळे महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याच्या निकालात सुधारणा करून निकाल जाहिर करण्याबाबतची तसेच महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात येत आहे.** | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |
| **ठराव** | के.सी. विधी महाविद्यालयातील श्री. शाह नितेश राजेंद्र (आसन क्रमांक ८३३३९) या विद्यार्थ्याचे विधी शाखेच्या द्वितीय वर्ष (सत्र-४) एप्रिल, २०१५ या परीक्षेचे गुण, निकाल जाहिर झाल्यानंतर पाठविल्यामुळे महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याच्या निकालात सुधारणा करून निकाल जाहिर करण्याबाबतची केलेली विनंती तसेच महाविद्यालयावर | — |

| | | |
|---|---|---|
| | दंडात्मक कारवाई करणेबाबत परिक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारशीवर सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, या प्रकरणी विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नसल्याने विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल ट्रेनिंग गुण विचारात घेऊन विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्याबाबत परिक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयाची नोंद घेण्यात आली.<br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, रूपये ५,०००/- आणि रूपये ५०,०००/- दंड कमी करणेबाबत सन २०१६ ते २०१८ पर्यंत सदर प्रकरणाची संपुर्ण कागदपत्रांसह माहिती कालक्रमानुसार (cronology) व्यवस्थापन परिषदेसमक्ष सादर करण्यात यावी. | - |
| परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्र.परीक्षा/निकाल/४१०७/२०१९ दि. २७ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रान्वये सदर प्रकरणाची संपूर्ण कागदपत्रासह माहिती कालक्रमानुसार देण्यात आली आहे. | |
| बाबः ७ | **खैरूल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीस्चे महाराष्ट्र महाविद्यालयांनी बी. एस्सी. या परीक्षेतील भौतिकशास्त्र या विषयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस "डॉ. रफीक झकारिया" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव...** | शिष्यवृत्ती विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, खैरूल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीसचे महाराष्ट्र महाविद्यालय यांनी बी. एस्सी. या परीक्षेतील भौतिकशास्त्र या विषयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस "डॉ. रफीक झकारिया" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याबाबत व रू. ५,००,०००/- (रूपये पाच लाख) रूपये देणगी म्हणून स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>तसेच चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातर्फे किती सुवर्ण पदक व पुरस्कार विद्यार्थ्यांना दिले जातात त्याबद्दल वर्षनिहाय माहिती देण्यात यावी.<br><br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, ज्या सुवर्ण पदाकांना सुरूवात होवून १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, त्याचे पुनरावलोकन करण्यात यावे व त्यासाठी प्र-कुलगुरू व डॉ. रश्मी ओझा यांची समिती गठित करण्यात यावी. | - |
| शिष्यवृत्ती विभाग यांनी केलेली कार्यवाही | शिष्यवृत्ती विभागाने पत्र क्र.Sch/734/2019 dt 29/1/2019 नुसार रू. ५,००,०००/- चा धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्याबाबत खैरूल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीसचे महाराष्ट्र महाविद्यालयास सांगितले असून तो जमा करण्यात आला आहे. | - |
| बाबः ८ | **MOU signed between the Observer Research Foundation, Mumbai and Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous ) for information and ratification.** | विद्याविषयक नियोजन व विकास विभाग **Eco(MSE-PP)** |
| ठराव | It was resolved that MOU signed between the Observer Research Foundation, Mumbai and Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous ) be ratified subject to inclusion of the clause in the MOU that their shall not be any financial liability on the University and Arbitration place should be Mumbai. | |

| | | |
|---|---|---|
| विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने केलेली कार्यवाही | विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क्र.APD/ICD/2018-19/474 dt. 12 December, 2018 नुसार मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसी यांना पत्र पाठविल्याचे कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| Mumbai School of Economics & Public Policy विभागाने केलेली कार्यवाही | मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स विभागाने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या ई-मेल द्वारे सविस्तर माहिती कळविली आहे. | |
| बाब: ९ | **Proposal to establish chair in the memory "Justice M.L. Pendse." In "Environmental Law."** | विद्याविषयक नियोजन व विकास विभाग |
| ठराव | It was resolved that the proposal to establish chair in the memory of "Justice M.L. Pendse" in Environmental Law be accepted in principle and detailed proposal with the information of funds for establishing chair be submitted.<br>Further, it was resolved that the Pro-Vice-Chancellor and Dr. Rashmi Oza be authorized to discuss and finalized the duration and fund required for establishing the chair in the University.<br>It was also resolved that the information regarding number of Chairs in the University be submitted, by the Pro-vice-chancellor. | |
| विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने केलेली कार्यवाही | विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क्र.APD/ICD/2018-19/475 dt. 5 December, 2018 नुसार विधी विभाग प्रमुखांना पत्र पाठविले आहे.(प्रत संलग्न) कार्यवाही सुरू आहे. | - |
| विधी विभागाने केलेली कार्यवाही | विधी विभागाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या ई-मेल द्वारे सविस्तर माहिती कळविली आहे. | |
| बाब: १० | **Increase of E-charge of Rs. 10/- per student in University share.** | यु.सी.सी. विभाग |
| ठराव | It was resolved that the information regarding amount received as e-charges and e-suvidha and the expenditure incurred from that amount be submitted to the Management Council. | - |
| यु.सी.सी. विभागाने केलेली कार्यवाही | केंद्रिय संगणकीय सुविधा विभागाने पत्र क्र.UCC/AR-EA/638/2018 दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी कार्यवाही केल्याचे कळविले आहे.(पत्र संलग्न) | |

| | | |
|---|---|---|
| बाब: ११ | **Fixation for Hostel and Rental fees for Madame Bhikaji Cama Hostel, Churchgate, Mumbai.** | क्षेत्र विकास विभाग, मादाम कामा वसतिगृह |
| ठराव | सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, प्रत्येक विद्यार्थीनीला रूपये १,२५,०००/- प्रती वर्षी लागू करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.<br>तसेच असा ही ठराव करण्यात आला की, प्रत्येक विद्यार्थीनीकडून वसतिगृहासाठी कमीत-कमी दर आकारण्यात यावा व यासाठी खालील बाबीचा विचार करण्यात यावा:-<br>१. विद्यापीठ फंडातून सबसिडी देण्यात यावी.<br>२. विविध शासकीय/अशासकीय संस्थाकडून अनुदान मिळण्याकरीता प्रयत्न करण्यात यावेत.<br>३. वसतिगृहाचा तळमजला बॅकेंस किंवा इतर संस्थाना भाडयाने देण्यात यावा.<br>४. जागा शिल्लक असल्यास मुंबई विद्यापीठा व्यतिरीक्त अन्य विद्यार्थींनी किंवा नोकरी करणा-या महिलांसही वाढीव दराने भाडे आकारून देण्यात यावे.<br>वरील गोष्टीचा आढावा घेण्यासाठी पुनरावलोकन समिती गठीत करण्यात यावी व सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| मादम कामा वसतिगृह अधिक्षकाने केलेली कार्यवाही | मादम कामा मुलींचे वसतिगृह यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या पत्रा द्वारे पुनरावलोकन समितीचा अहवाल सादर केला आहे. ॲड. निल हेळेकर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जानेवारी, २०१९ च्या बैठकीत बाब क्र. २१ अन्वये ठेवण्यात आला. | |
| बाब: १२ | **पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करणेबाबतच्या वेगवेगळया गटांकडून प्राप्त तक्रारीबाबत.** | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.) |
| ठराव | The People's Education Society is established on 8th July, 1945 and running four Aided Colleges affiliated to the University of Mumbai. There is a dispute in the Management pending before the Charity Commissioner, Mumbai for years together and litigation is going on.<br>Therefore in the wider interest of the students, the State Government decided to appoint Incharge Principals and accordingly directed the Universtiy vide letter dated 24.4.2014. The said appointment was made as per seniority list of the respective colleges though the said appointment was for temporary period of six months, the same was continued from time to time.<br>On the basis of one letter dated 21.7.2018 under the Right to Information Act, 2005 and order of suspension dated 4.8.2018, the University took | |

| | | |
|---|---|---|
| | decision to appoint:<br>Dr. Garje in the place of Dr. Rao (Sidharth College of Arts, Science and Commerce)<br>Ms. Sandhya Dhoke in place of Dr. Sudhakar Reddy (Sidharth College of Law).<br>The University of Mumbai vide letter dated 24.9.2018 addressed to the Charity Commissioner requested for names of the Trustees. The Charity Commissioner in his letter dated 29.9.2018 has clarified that the seven different Change Reports are sub-judice and therefore refused to make any comment on the names of the Trustees of the Peoples's Education Society.<br>Therefore, from the correspondence with the Charity Commissioner, it is clear that none of the trustees has any authority to take decision in respect of the day to day administration of the Colleges including appointment and suspension of the Principal without permission of the Charity Commissioner.<br>From the records, it is also clear that the matter is sub-judice and till the entire dispute is resolved, in the larger interest of the students, we need to abide by the directions of the Government of appointment of Incharge Principals on the basis of seniority.<br>The Management Council therefore **Resolved** to maintain Status-quo as on 11.6.2018. The subsequent orders of appointment of Incharge Principals are irregular and contrary to seniority list and therefore cannot sustain and continued. The said appointment order dated 27.8.2018 be withdrawn immediately and the earlier Incharge Prinipals may be reinstated. However, it is clarified that the salary and allowances (if any) enjoyed and withdrawn by the subsequent Incharge Principals may not be recovered. | |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.) यांनी केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र. टीएएएस(सीटी)/आयएस/ईसीडी/२०१८-१९/४१७१ दि. २७ ऑगस्ट, २०१८ नुसार डॉ. म्हस्के, डॉ. राव व डॉ. रेड्डी यांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन, निवृत्तीवेतन व विद्यार्थ्यांशी संबंधित महत्वाचे दैनदिन कामकाज करण्याकरीता प्राधिकृत करण्यात आल्याचे कळविले आहे. | |
| बाब: १३ | **To give promotion to higher post after retirement from a particular post to Shri S.T. More.** | आस्थापना विभाग १/३ |
| बाब: १४ | **Seniority issues both Shri S.N. Bagde and Shri A.P. Kolge.** | आस्थापना विभाग १/३ |
| बाब: १५ | **श्री संजय बागले यांना, सहायक लेखापाल (वित्त व लेखा विभाग) पदावरून उपलेखापाल पदावर २०१५ पासून पदोन्नती देण्याबाबत.** | आस्थापना विभाग १/३ |
| ठराव | It was resolved that matter of item Nos. 13,14,15 be studied in detail at administrative level along with all such similar cases. Committee consisting of representative of administration, finance and legal adviser shall study these cases and suggest the appropriate action keeping in view the administrative, financial and legal implications. | |

| | | |
|---|---|---|
| आस्थापना विभाग १/३ यांनी केलेली कार्यवाही | आस्थापना विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/२८५१ दि. २३ जानेवारी, २०१९ नुसार बाब क्र. १३, १४, १५ बाबत समिती गठीत करून सदर समितीची बैठक दि. २६ नोव्हेंबर, २०१८ व २१ डिसेंबर, २०१८ रोजी पार पडली.<br>तसेच पत्र क्र.एसटी/आयसीडी/१८-१९/३०५९ दि. १४ फेब्रुवारी, २०१९ नुसार काही सदस्यांचे अभिप्राय अप्राप्त असून या संदर्भात लवकरात लवकर समिती अहवालास अंतिमरूप देण्याबाबत आस्थापना विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. | - |
| बाब: १६ | **Proposal received from the Principal Kokan Gyanpeeth, Rahul Dharkar College of Phyarmacy & Research Institute, Tal. Karjat. Dist- Raigad-410 201. For Closure for M. Pharm. Degree Course in the subject of Quality Assurance from the Academic Year 2017-18.** | प्रबंध विभाग |
| ठराव | It was resolved that the matter be deferred and placed before MC, after receiving a report of the Mukadam committee constituted to advice University on closure of course.<br>It was also resolved that the matter of closure of colleges/institutions, closure of courses be placed before the Management Council after receiving the report of the Mukadam committee. | - |
| प्रबंध विभागाने केलेली कार्यवाही | प्रबंध विभागाने पत्र क्र.Th/ICD/2018-19/4299 दि. २६ डिसेंबर, २०१८ नुसार एम फार्म डिग्री कोर्स बंद करणेबाबत श्री दिपककुमार मुकादम यांच्या समितीकडे पत्र पाठविले आहे. | |
| बाब: १७ | **To clarify the action taken in the matter of appointment of Shri Ghodke and the orders issued to Shri Tambe by bringing an end to his services in accordance to the Hon'ble High Court and Supreme Court orders.** | आस्थापना विभाग १/३ |
| ठराव | It was resolved that the matter be studied at administrative and legal level. If the issue is not resolved at administrative level the matter be placed before the Management Council. | |
| आस्थापना विभाग १/३ यांनी केलेली कार्यवाही | आस्थापना विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/२८५१ दि. २३ जानेवारी, २०१९ नुसार रोजी बाब क्र. १७ बाबत समिती गठीत करून समितीची बैठक २६ नोव्हेंबर, २०१८ व २१ डिसेंबर, २०१८ रोजी पार पडली असे कळविले आहे. | |
| बाब: १८ | **To create the post of Chief Executive Officer for the Incubation Centre at Kalina Campus.** | आस्थापना विभाग १/३ |
| ठराव | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २० नुसार नवोपक्रम, नवोसंशोधन व सहाचार्य मंडळाच्या अंतर्गत विद्यानगरी येथे नवसंशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे स्टेट इनोवेशन सोसायटीतर्फे पत्र क्र. MSinS/२०१८/C-R/Inc/LoI अन्वये प्राप्त झालेले इरादापत्र (letter of Intent) व या केंद्रासाठी ५ कोटी रू. प्राप्त होणार असल्याची नोंद घेण्यात आली व प्र-कुलगुरूचे अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले. | - |

| | | |
|---|---|---|
| | पुढे असाही ठराव करण्यात आला की, या केंद्रासाठी पुर्णवेळ काम करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८(२)(डी)(आय) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Executive Officer) हे पद कंत्राटी पध्दतीने, सदर केंद्र सुरू असे पर्यंतच्या अटींवर निर्माण करण्यात यावे. या पदासाठी अर्हता, अनुभव कर्तव्य, जबाबदाऱ्या, अधिकार व वेतन सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे असतील. | - |
| आस्थापना विभाग १/३ यांनी केलेली कार्यवाही | आस्थापना विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/२८५१ दि. २३ जानेवारी, २०१९ रोजी नवसंशोधन केंद्रासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाकरीता दि. ५ डिसेंबर, २०१८ रोजी जाहिरात देऊन अर्ज मागविले आहेत, छाननी प्रक्रिया सुरू आहे, असे कळविले आहे. | |
| बाब: १९ | **Ordinance on to Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student.** | महिला विकास कक्ष विभाग (WDC) |
| ठराव | It was resolved that a committee consisting of Adv. Shri. Neel Helekar (Convener), Dr. Rashmi Oza and Shri Pradeep Sawant be constituted to finalize the Ordinance.<br><br>It was also resolved that the Ordinance on Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student be approved subject to corrections and modifications suggested by the Adv. Helekar committee and the same may be placed before the Management Council for information and ratification. | - |
| महिला विकास कक्ष विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि. २७ नोव्हेंबर, २०१८ च्या बैठकीत क्र. १७ अन्वये ठेवण्यात आली व ठराव महिला विकास कक्षास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. कार्यवाही सुरू आहे. | |
| बाब: २० | **डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या वेतनाबाबत मा. प्र-कुलगुरू यांच्या एक सदस्यीय समितीच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीचा अहवाल.** | शि. नि. व मा. विभाग (वि.शि.) |
| ठराव | डॉ. जोस जॉर्ज यांना ६० वर्ष पुर्ण झाल्यावर विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या वेतनाबाबत याचिका क्र. ११०२७/२०१६, मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, शासनाने याप्रकरणी निर्गमित केलेले आदेश तसेच मा. प्र-कुलगुरू यांच्या एक सदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी आणि अन्य कागदपत्र विचारात घेता सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या वेतनाची वसुली करण्यात यावी. तथापी डॉ. रविंद्र सांगुर्डे यांनी डॉ. जोस जॉर्ज यांच्या वेतन वसूलीस नापसंती दर्शवली. श्री. दिपककुमार मुकादम, ॲड. निल हेळेकर यांनी डॉ. जोस यांच्याकडून माननिय कोर्टाच्या आदेशानूसार वेतनाची वसूली करण्यात यावी, असे स्पष्ट केले.<br><br>चर्चेअंती असाही ठराव करण्यात आला की, डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ | |

| | | |
|---|---|---|
| | फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षाच्या वेतनाची संपूर्ण वसुली करण्यात यावी, सेवा निवृत्ती वेतनाची प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात यावी. डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात निवृतीनंतर केलेली सेवा विचारात घेता त्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य ती भरपाई देण्याबाबत स्वतंत्र बाब व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवावी. | |
| **शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.) यांनी केलेली कार्यवाही** | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.) विभागाने पत्र क्र. TAAS/(UT)/ICD/2018-19/1314 दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी डॉ. जोस जॉर्ज यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान विषयक लाभाबाबत. तसेच पत्र क्र.TAAS/(UT)/ICD/2017-18/1017 दिनांक ४ डिसेंबर, २०१८ नूसार उपरोक्त विषया संदर्भात मा. सदस्य डॉ. रविकांत सांगुर्डे यांना पत्र पाठविले आहे. | |
| | <u>आयत्यावेळी आलेले विषय</u><br>**आयत्या वेळी आलेल्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली व त्या अनुषंगाने खालील प्रमाणे ठराव पारित झाले :-** | |
| **ठराव** | १)विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाल्यानंतर जे कर्मचारी/शिक्षक विद्यापीठ वसाहतीमध्ये रहात असतील त्यांना त्वरीत विद्यापीठातील जागा रिक्त करण्यास सांगावे. तसेच त्यांच्याकडून नियमाप्रमाणे भाडे आकारण्यात यावे. सेवेतून निवृत्त होवून विद्यापीठात राहत असलेल्या कर्मचारी/शिक्षकांची यादी व त्यांच्या घर भाडयाची थकबाकी व्यवस्थापन परिषदेत सादर करावी. | सामान्य प्रशासन विभाग फोर्ट |
| **सामान्य प्रशासन विभाग फोर्ट यांनी केलेली कार्यवाही** | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र.GAD/ICM/2018-19/1070 दिनांक १४ डिसेंबर, २०१८ नुसार सदर शिक्षक कर्मचा-यांची माहिती व त्यांच्याशी झालेला पत्र व्यवहाराची माहिती दिली आहे. (छांयाकित प्रत संलग्न) तसेच पत्र क्र.GAD/ICM/2018-19/1057 दिनांक ७ डिसेंबर, २०१८ नुसार शिक्षकेत्तर कर्मचा-यांची माहिती दिली. दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी पत्र क्र.GAD/ICM/2018-19/1542, 1543, 1544, 1545 नुसार अनुक्रमे डॉ. अभय पेठे, डॉ. बी.एल. जाधव, डॉ. म. हेमलता व डॉ. आर.ए. ऐतल यांना थकीत देय रक्कमेचा भरणा करण्याबाबत व सदनिका विद्यापीठास हस्तांतरीत करण्याबाबत पत्रे पाठविली आहेत. | |
| **ठराव** | २)तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमात श्री. दिनकर मनवर या लेखकाचे 'दृश्य' व 'दृश्यात' हे पुस्तक निश्चित करण्यात आले होते. परंतु सदर पुस्तकातील 'पाणी कस असत' या कवितेत आदिवासी मुलीबद्दल आक्षेपार्ह ओळी असल्याने ते पुस्तक अभ्यासक्रमातून वगळण्याबाबत काही संघटनानी मागणी केली होती. या बाबत संबंधित अभ्यास मंडळ व अधिष्ठाता यांनी शिफारस केल्याप्रमाणे संबंधित कविता त्वरित वगळण्यात आल्याचे कुलगुरूंनी सांगितले. सदर बाब अभ्यास मंडळ (बोर्ड ऑफ स्टडीज्) च्या बैठकीत उचित कार्यवाहीसाठी ठेवण्यात यावी. | **विद्याविषय प्राधिकरणे** |
| **विद्याविषय प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही** | विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने पत्र क्र. वि.प्रा.वि. /आयसीडी/२०१८-१९/८९१ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ नुसार विद्यापीठाने क्र.युजी/११८/२१८ दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. | |

| | | |
|---|---|---|
| ठराव | ३)उत्तर पत्रिकेवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्यात आल्याबाबत वृत्तपत्रात आलेल्या बातमीविषयी सभागृहाला अधिकची माहिती देण्याची मागणी सदस्यांनी केली. उत्तर पत्रिकेवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्याआधी परिक्षा व मुल्यमापन मंडळाची मान्यता घेण्यात आली होती काय? असा प्रश्न डॉ. वैभव नरवडे यांनी उपस्थित केला. याबाबत खुलासा करताना संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी सांगितले की, परिक्षा व मुल्यमापन मंडळाची परवानगी घेऊनच निर्णय घेण्यात आला आहे. श्री. प्रदिप सावंत यांनी याबाबत तीव्र आक्षेप नोंदवीत प्रश्न उपस्थित केला की, संचालकांच्या दृष्टीकोनातून शिक्षकांना विद्यार्थ्यांचे नाव दिसणार नाही. परंतु शिक्षकांव्यतिरिक्त अनेक घटक उत्तर पत्रिका हाताळत असल्याने केवळ शिक्षकच गैरप्रकार करतात म्हणून त्यांना विद्यार्थ्यांचे नाव दिसणार नाही, हा संचालकांचा खुलासा आक्षेपार्ह असल्याचे मा. सदस्य श्री. प्रदीप सावंत यांनी सांगितले. अनेक विद्यार्थी आसन क्र. चुकीचा टाकतात त्यामुळे उत्तरपत्रिकेत नावाचा उल्लेख असल्यास २०१७ सारखी परिस्थिती निर्माण होणार नाही या संचालकाच्या मताबाबत मा. सदस्य श्री.प्रदीप सावंत म्हणाले की, २०१७ मध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत ६००० ते ७००० विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका सापडत नव्हत्या. परंतु त्यानंतर विविध तांत्रिक उपाययोजना केल्यावर त्यानंतरच्या परिक्षेत ही संख्या तीनशे पर्यंत आली व पुन्हा काही उपाययोजना केल्यास ही संख्या आणखी कमी होऊ शकते. एक ते दोन वर्षात या परिस्थितीवर पुर्णपणे मात करता येवू शकते, असे श्री.प्रदीप सावंत म्हणाले. अशाच प्रकारचे मत मा. सदस्य श्री. दिपककुमार मुकादम यांनी मांडले व कोणत्याही परिस्थितीत तीनशे विद्यार्थ्यांसाठी २७,००,००० उत्तरपत्रिकांवर नाव छापणे संयुक्तिक नाही, असे ते म्हणाले.<br><br>याबाबत सभागृहाने तीव्र आक्षेप नोंदवला व कुलगुरूंना निवेदन करण्याची विनंती केली. मा. कुलगुरूंनी सांगितले की, कोणताही निर्णय घेतांना त्याबद्दल काही कारणमिमांसा असते. उत्तरपत्रिकांवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्याचा निर्णय परिक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये झाल्याचे डॉ. अर्जुन घाटूळे यांनी स्पष्ट केले असल्याने याबाबत नेमका निर्णय काय झाला त्याबाबत संचालकांनी मा. कुलगुरूंसोबत बसून त्याची पडताळणी करण्यात येईल व निर्णय अत्यंत महत्वाचा असल्याने याबाबत इतर तज्ज्ञांची मते घेवून पुन्हा परिक्षा व मुल्यमापन मंडळात चर्चा करण्यात येईल.<br>परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या सदस्यांशी त्वरित संपर्क साधून त्वरित मंडळाची बैठक आयोजित करण्यात येईल व याविषयावर तातडीने योग्य तो निर्णय घेण्यात येईल. परिक्षा पध्दती ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने कोणत्याही घटकांच्या मनात संशय निर्माण होणार नाही व विद्यापीठाच्या निर्णयामुळे लोकांच्या मनात चुकीचा संदेश जाणार नाही, यांची पुरेपुर काळजी घेण्यात येईल, असे मा. कुलगुरूंनी सांगितले. | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |

| | | |
|---|---|---|
| परीक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेली कार्यवाही | पत्र क्र. परीक्षा/कें.मु.कें./१६१२/२०१८ दिनांक १२ डिसेंबर, २०१८ नुसार परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ च्या इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे. | |
| ठराव | ४)सी.एच.एम. महाविद्यालय, उल्हासनगर येथील प्लॅगरिझम प्रकरणी प्राचार्य आणि व्यवस्थापनाने विद्यापीठाच्या सुचनेनंतर अद्याप कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे मा. सदस्य डॉ. वैभव नरवडे यांनी निदर्शनास आणले असता, विद्यापीठामार्फत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये लवकरात लवकर तक्रार दाखल करण्यात येईल, असे प्रभारी कुलसचिवांनी स्पष्ट केले. | शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र. TAAS(CT)/ICD/17-18/18086 दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ नुसार प्रशासनास टिपणी सादर केली आहे. तसेच शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने(म.शि.)(वि.शि.) विभागाचे उपकुलसचिवांना प्रभारी कुलसचिवांनी याबाबत तक्रार दाखल करण्याकरिता उल्हासनगर पो.ठाणे येथे उपस्थित राहण्यास सांगितल्याचे पत्र दिले आहे. | |
| ठराव | ५)प्रा. वैभव नरवडे यानी सी.एच.एम महाविद्यालयातील निवृत्त प्राचार्य मॅथ्यू यांच्या पेंशनबाबत प्रश्न उपस्थित केला व याबाबत खालीलप्रमाणे निवेदन केले.<br>“प्रा. मॅथ्यू यांचेबाबत एका महिला शिक्षकेने महिला विकास कक्षाकडे तक्रार दाखल केली होती. महिला विकास कक्षाने महाविद्यालयाकडे शिफारशींसह अहवाल पाठवला. त्यानुसार प्रा. मॅथ्यू यांना शिक्षा ठोठावण्यात आली. प्रा. मॅथ्यू यांनी माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मागितली असता माहिती देण्यात आली नाही. अर्जदाराने याबाबत प्रथम अपिल केले असता अर्जदारास माहिती देण्यात आली नाही. त्यानंतर अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दुसरे आपिल केले व आयोगाने माहिती देणेबाबत महिला विकास कक्षाला आदेश दिले परंतु महिला विकास कक्षाने राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची दखल न घेतल्याने आयोगाने संबंधितांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. सदरची चौकशी पूर्ण करावी व त्याची माहिती देण्यात यावी.<br>प्रा. नरवडे यांनी व्यवस्थापन परिषदेच्या निर्दशनास एक गंभीर बाब आणली की, महिला विकास कक्षाच्या तत्कालिन अध्यक्षांचा कार्यकाळ दि. २५/१०/२०१६ रोजी संपला असताना त्यांनी प्रा. मॅथ्यू यांचेबाबत सहसंचालकांना दि. १५/१२/२०१६ रोजी कोणत्या अधिकारात पत्र पाठवले त्याचा खुलासा प्रशासनाने करावा.”<br>श्री. दिपककुमार मुकादम म्हणाले की, सबंधित अध्यक्षांचा कालावधी संपल्यानंतर सहसंचालकांना त्यांनी पत्र कसे काय पाठविले? ही बाब अत्यंत गंभीर असून त्यांनी पदाचा गैरवापर केला असल्याने याबाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी | शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) |

| | | |
|---|---|---|
| | केली. याबाबत चौकशी समिती गठीत करण्यात यावी, असा ठराव करण्यात आला व समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br>याबाबत कुलसचिवांनी सांगितले की, प्रा. मॅथ्यू यांचे पेंशनबाबत त्वरीत सहसंचालकांकडे पत्रव्यवहार करण्यात येईल. राज्य माहिती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात येईल. | |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.) विभागाने पत्र क्र. TAAS/(CT)/ICD/2018-19/860 दिनांक २ जानेवारी, २०१९ नुसार ॲड निल हेळेकर यांच्या अध्यक्षते खाली गठीत केलेल्या समितीस बैठकीची तारीख व वेळ निश्चित करण्याबाबत पत्र पाठविले आहे.<br>तसेच पत्र क्र.TAAS/(CT)/ICD/2018-19/933 दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार डॉ. रश्मी ओझा यांची एक सदस्यिय समिती गठीत केली आहे. | |
| ठराव | ६)प्रा. वैभव नरवडे यांनी सी.एच.एम. महाविद्यालय, एच.आर. महाविद्यालय, के.सी.महाविद्यालय, नारी गुरसाहनी विधी महाविद्यालय, सोनवणे महाविद्यालय, एम.सी.सी.महाविद्यालय या सर्व महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य आहेत असे निर्दशनास आणले. या सर्व महाविद्यालयांना प्राचार्यांची पदे त्वरित भरण्याकरिता कार्यवाही सुरू करण्याची सूचना विद्यापीठातर्फे देण्यात यावी, असे ठरले.<br>तसेच इतर महाविद्यालयात जेथे प्रभारी प्राचार्य आहेत, त्या महाविद्यालयांना सुध्दा कायमस्वरूपी प्राचार्य भरण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सूचना देण्यात यावी. | शिक्षक नियुक्ती व मान्यता (वि.शि.)<br>शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.) विभागाने संलग्नित महाविद्यालयात नियमित प्राचार्य नियुक्ती बाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. परिपत्रक क्र.TAAS/(UT/CT)/10/2018-19 दिनांक ९ जानेवारी, २०१९. | |
| ठराव | ७)डॉ. वैभव नरवडे यांनी विद्यापीठाच्या विनाअनुदानित विभागात एक/दोन प्राध्यापक आहेत. तसेच कायमस्वरूपी प्राध्यापक भरती होईपर्यंत त्या प्राध्यापकांची पुर्ननियुक्ती करून त्यांना तात्पुरती मुदत वाढ देण्यात यावी, अशी मागणी केली. त्या अनुषंगाने नियमानुसार भरती होईपर्यंत जे प्राध्यापक कार्यरत आहेत, त्यांना ठरावीक कालावधीसाठी (on contract) पुर्ननियुक्ती देण्यात यावी, असे ठरले. | शिक्षक नियुक्ती व मान्यता (वि.शि.) |

| | | |
|---|---|---|
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.) यांनी केलेली कार्यवाही | शिक्षक नियुक्ती व मान्यता (वि.शि.) विभागाने पत्र क्र. TAAS(UT)/ICD/2018-19/1649 Dated 26th March, 2019 नुसार सध्या विद्यापीठाच्या अनुदानित व विनाअनुदानित विभागामध्ये गतवर्षी जे प्राध्यापक कार्यरत होते. त्याच प्राध्यपकांची सन २०१८-१९ मध्ये पुर्ननियुक्ती करण्यात आली आहे.<br>महाराष्ट्र विद्यापीठ सार्वजनिक अधिनियम, २०१६ कलम १०२ नुसार हंगामी तत्वावरील ११ महिन्यांच्या भरती प्रक्रियेकरिता Online अर्ज मागविण्यात आलेले आहेत. संबंधित जाहिरातीची प्रत आपल्या माहिती करीता सोबत जोडीत आहे. | |
| ठराव | ८)राष्ट्रीय/राज्यस्तरीय स्तरावरील सांस्कृतिक, क्रिडा, एन.एस.एस. आणि एन.सी.सी. मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसता न आल्यास त्यांची परिक्षा घेणेबाबत विद्यापीठाने परिपत्रक निर्गमित करावे अशी मागणी सदस्यांनी केली असता ती मान्य करण्यात आली. | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |
| परीक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेली कार्यवाही | सर्वसमावेशक व्यवस्था निर्माण करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल परीक्षा व मुल्यमापन मंडळापुढे दिनांक १९ मार्च २०१९ (बाब क्र. ८ – Table Item) ठेवली असता त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. | |

टिप - व्यवस्थापन परिषदेत सादर केलेल्या कार्यवाही अहवालाबाबत संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली मुळ कागदपत्रे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पडताळणीसाठी आवश्यक असल्यास उपलब्ध करून देण्यात येतील.

मुंबई – ४०० ०३२
२६ मार्च, २०१९

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)